# उच्च वेतनश्रेणी लाभ सर्वसमावेशक सूचना (Ready Reckoner)

## सा.आ. ७४(क) दि. ३०.०४.१९७४ व सा.आ. १११ (क) दि. १३.०५.१९८२

| अक्र. | विषय / मुद्दा | कालपरत्वे लागू असणाऱ्या तरतुदी आणि विद्यमान तरतुदी / स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | **उच्च वेतनश्रेणी लाभाकरीता पात्र सेवा कालावधी** | सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ चे सुधारपत्र क्र. ९ दि.०६.०५.१९८३ अन्वये पदोन्नती पासून वंचित राहीलेल्या तथा त्याच पदावर६ वर्षांचा कालावधी पूर्ण केला आहे अशा कर्मचा-यांना उच्च वेतनश्रेणीचा प्रथम लाभ मंजूर करण्यात येईल.<br><br>सुधारपत्र क्र. १५ दि. ०३.०४.१९९० अन्वये प्रथम लाभ घेतल्यापासून ९ वर्षे पूर्ण केल्याचा अथवा **प्रथम लाभाच्या पदावर रूजू झाल्यापासून ६ वर्षपूर्ण केल्याचा दिनांक** यापैकी जो दिनांक अगोदर येत असेल त्या दिनांकापासून द्वितीय लाभ मंजूर करण्यात येतो.<br><br>सुधारपत्र क्र. २० दि. ०१.०१.१९९६ अन्वये **पदोन्नतीवर रूजू झाल्यापासून ६ वर्षे पूर्ण केल्याचा** अथवा प्रथम लाभ घेतल्यापासून ९ वर्षे पूर्ण केल्याचा दिनांक यापैकी जो दिनांक अगोदर येईल त्या दिनांकापासून व्दितीय लाभ मंजूर करण्यात येतो. याच धर्तीवर एखादा कर्मचारी सरळसेवा भरतीव्दारे उच्च पदावर रूजू झाला असल्यास त्या दिनांकापासून ६ वर्षे पूर्ण केल्याचा अथवा प्रथम लाभ घेतल्यापासून ९ वर्षे पूर्ण केल्याचा दिनांक यापैकी जो दिनांक अगोदर येईल त्या दिनांकापासून व्दितीय लाभ मंजूर करण्यात येईल.<br><br>सुधारपत्र क्र. १० दि. २२.११.१९८४ नुसार पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध नसणाऱ्या कर्मचाऱ्यांकरीता प्रथम तसेच व्दितीय लाभाकरीता ६ वर्षांचा कालावधी पूर्ण केला असणे आवश्यक आहे.<br><br>प्रशासकीय परिपत्रक क्र. ३०४ दि. २८.०७.२०१० अन्वये उच्च वेतनश्रेणीच्या तृतीय लाभाकरीता २८ वर्षे सेवा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. |
| २ | **पदोन्नतीबाबतचे पात्रता निकष लागू असणे.** | सा.आ.क्र. ७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ चे सुधारपत्र क्र. १दि. ०१.०१.१९७६ अन्वये पदोन्नती करीत आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व अनुभव उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करतेवेळी देखील आवश्यक आहे. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८३ दि. १९.०१.२०१२ अन्वये रिक्तपदांअभावी कर्मचा-यास पदोन्नती मिळाली नसल्यास कुंठीतता (Stagnation) दूर करण्यासाठी उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यात येत असल्यामुळे त्यावेळी कर्मचा-याने पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. |
| ३ | **गोपनीय अहवाल मुल्यांकन** (उच्च वेतनश्रेणी लाभ देय दिनांकास लागू असणारेनियम विचारात घेण्यात येतील.) | विभागीय परिपत्रक क्र. ३१९ दि. १९.०४.१९८४ नुसार कर्मचाऱ्यास उच्च वेतनश्रेणी लाभ ज्या दिनांकास देय आहे त्या दिनांकापूर्वीच्या कालावधीचे गोपनीय अहवाल मुल्यांकन लाभ देण्याकरीता विचारात घेण्यात येईल तसेच सदर कालावधीमधील प्रलंबित शिस्तभंग कारवाई प्रकरणे देखील विचारात घेण्यात येतील.<br><br>सा.आ.क्र. ७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ चे सुधारपत्र क्र.२७ दि. २१.०५.१९९८ अन्वये बिगरनिवड पदांकरीता (Non Selection Posts) ३ वर्षाचे गोपनीय अहवाल मुल्यांकन आवश्यक आहे. त्यानुसार अर्हताप्राप्त कर्मचा-यांकरीता ९ आणि अर्हतारहीत कर्मचा-यांकरीता १० तथापि मागासवर्गीय कर्मचा-यांकरीता १ गुण कमी असे निश्चित करण्यात आलेले आहे. तसेच निवड (Selection Posts) पदांमधील अर्हताप्राप्त कर्मचा-यांकरीता ५ वर्षांचे गोपनीय अहवाल मुल्यांकन १७ आणि पदविकाधारक अभियंत्यांकरीता १८ असे करण्यात आले आहे. तसेच ३/५ वर्षांच्या मुल्यांकनानुसार आवश्यक गुण प्राप्त होत नसल्यास ६/१० वर्षांचे |

| | | |
|---|---|---|
| | | मुल्यांकन दुप्पट गुणांएवढे आवश्यक असेल. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांकरीता १ गुणाने कमी मुल्यांकन लाभ देण्याकरीता गृहीत धरण्यात येईल.<br><br>प्रशासकीय परिपत्रक क्र.२५६ दि. ३०.१०.२००९ अन्वये बिगर निवड पदांवरील पदोन्नतीकरीता ३ वर्षाऐवजी एकूण ५ वर्षांचे गोपनीय अहवाल मुल्यांकन विचारात घेण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर तरतूद उच्च वेतनश्रेणी लाभाकरीता देखील लागू असेल.<br><br>प्रशासकीय परिपत्रक क्र.३१० दि. २५.०८.२०१० नुसार एखाद्या कर्मचाऱ्याचे गोपनीय अहवाल पुनर्परीक्षण करण्यात येउन मुल्यांकनात वाढ झाल्यास त्यास मागील दिनांकास (देय तारखेस) उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर न करता, पुनर्परीक्षण केल्याच्या आदेशाच्या (Prospective Effect) दिनांकास उच्च वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात येईल.<br><br>प्रशासकीय परिपत्रक क्र.४४६ दि.२०.०२.२०१३ अन्वये उपरोक्त ३/५ वर्षामधील गोपनीय अहवाल मुल्यांकन यामध्ये बदल करण्यात आला असून उपरोक्त ३/५ वर्षामधील एखाद्या वर्षाचे गोपनीय अहवाल मुल्यांकन "**साधारण**" (मागासवर्गीय कर्मचा-यांकरीता **निकृष्ट**) आढळून असल्यास संबंधित कर्मचारी उच्च वेतनश्रेणी लाभाकरीता पात्र असणार नाहीत अशी तरतूद आहे असे झाल्यास कर्मचाऱ्याची पात्रता दिनांक पुढे जाईल.<br><br>प्रशासकीय परिपत्रक क्र.५२६ दि. ०८.१२.२०१५ अन्वये पदोन्नतीकरीता ५ वर्षांचे गोपनीय अहवाल मुल्यांकन विचारात घेत असतांना अनुसरावयाची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे. सदरची कार्यपध्दती उच्च वेतनश्रेणी लाभ प्रकरणी देखील लागू करण्यात आलेली आहे, यामुळे पदोन्नती व उच्चस्तर वेतनश्रेणी लाभाकरीता गोपनीय अहवाल मुल्यांकन विचारात घेण्याची कार्यवाही समान राहील.<br><br>प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२४ दि. १०.०३.२०२१ अन्वये वेतनगट ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन करण्याबाबत सुधारीत मार्गदर्शक सूचना पारीत करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार लक्षणीय आणि पदोन्नतीकरीता पात्र असणारे कर्मचारी उच्च वेतनश्रेणीचा लाभ मिळण्यास देखील पात्र असतील. अशा प्रकरणी गोपनीय अहवाल मुल्यांकन लक्षणीय करीता ५ गुण आणि पदोन्नती करीता पात्र असणाऱ्या करीता "खूप चांगला" म्हणजे ४ गुण समजण्यात येतील.<br><br>प्रशासकीय परिपत्रक क्र.६४९ दि. ०४.११.२०२२ अन्वये राज्यस्तरीय सेवाज्येष्ठते मधील अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवाल मुल्यांकनामध्ये सुधारणा करण्यात आलेल्या असुन दि.२८.०९.२०२२ नंतर पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना मंजुर करावयाच्या उच्चवेतनश्रेणीच्या लाभासाठी सदर सुधारीत मुल्यांकने विचारात घेण्यात यावी. |
| ४ | **गोपनीय अहवाल मुल्यांकनाकरीता कमी / जादा गुण विचारात घेणे.** | प्रशासकीय परिपत्रक क्र.२५६ दि. ३०.१०.२००९ मधील खालील तरतुदी उच्च वेतनश्रेणी लाभाकरीता लागू असतील.<br><br>बिगर निवड पदातील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना एकूण मुल्यांकनामध्ये एका गुणाची सवलत देण्यात येईल.<br><br>तांत्रिक संवर्गातील अर्हतारहीत / पदविका धारक कर्मचाऱ्यांना एकूण मुल्यांकनापेक्षा एक जादा गुण आवश्यक असेल.<br><br>अतांत्रिक संवर्गामधील ज्या पदांकरीता पदवी आणि विभागीय उच्चस्तर परीक्षा उत्तिर्ण असणे आवश्यक आहे असे कर्मचारी दोन्ही पैकी एक अर्हता प्राप्त करीत असतील तर त्यांना एकूण मुल्यांकनापेक्षा एक जादा गुण आवश्यक असेल. |

| | | |
|---|---|---|
| | | तथापि, दोन्ही पैकी एकही अर्हता प्राप्त नसणाऱ्या कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करण्यात येणार नाही. |
| ५ | **उच्च वेतनश्रेणी लाभ देयतेबाबत पुनर्विलोकन प्रक्रिया (Review of HGB)** | सुधारपत्र क्र. ८ दि. २३.०६.१९८२ तसेच विभागीय परिपत्रक क्र. २९६ दि. २५.०५.१९८३ अन्वये एखादा कर्मचारी आवश्यक गोपनीय अहवाल मुल्यांकन प्राप्त करीत नसल्याने अथवा शिस्तभंग कारवाईमुळे उच्च वेतनश्रेणी लाभास पात्र ठरत नसल्यास सदर कर्मचाऱ्यास उच्च वेतनश्रेणी लाभ देयतेबाबत पुढील प्रत्येक वर्षाकरीता नविन गोपनीय अहवाल प्राप्त झाल्यानंतर माहे एप्रिल मध्ये पुनर्विलोकन करण्यात येईल. |
| ६ | **शिस्तभंग कारवाई**<br>(उच्च वेतनश्रेणी लाभ देय दिनांकास लागू असणारेनियम विचारात घेण्यात येतील.) | सा.आ.क्र. ७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ नुसार ज्या कर्मचाऱ्यावर शिस्तभंग कारवाई सुरू आहे किंवा कर्मचारी अशा कारवाई प्रकरणी शिक्षा उपभोगत आहे अशा कर्मचाऱ्यांचा शिक्षा कालावधी संपल्याखेरीज त्यांना उच्च वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात येणार नाही.<br><br>उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करणाऱ्या समितीस शिस्तभंग कारवाई बाबतची कागदपत्रे सादर करण्याबाबत प्रकरणपरत्वे प्रशासकीय परिपत्रक क्र. १२८ दि. १७.०१.१९९२ आणि प्रशासकीय परिपत्रक क्र. ३३५ दि. १५.१२.१९९९ विचारात घेण्यात यावे.<br><br>विभागीय परिपत्रक क्र. २९६ दि. २५.०५.१९८३ नुसार निलंबन कालावधी वगळून उच्च वेतनश्रेणी लाभाकरीता सेवा कालावधीची गणना करण्यात येते. तथापि, निलंबन कालावधी कर्तव्य कालावधी समजण्यात आल्यास अशा प्रकरणी उच्च वेतनश्रेणीचा लाभ देयतेच्या मूळ दिनांकास मंजूर करण्यात येईल. सदर निलंबन कालावधीत गोपनीय अहवाल नोंदविले  नसल्याने प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४६ दि. २०.०२.२०१३ मधील तरतूदींनुसार उच्च वेतनश्रेणी पात्रतेच्या दिनांकास कर्मचारी पूर्ण वेतन आणि भत्ते घेत असल्यास संबंधित कर्मचा-यास उच्चवेतनश्रेणीचा लाभ मंजुर करण्याची तरतुद आहे.<br><br>प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४६ दि. २०.०२.२०१३ चे शुध्दीपत्रक क्र. ८०१६ दि. ०९.०४.२०२१ अन्वये सदर तरतुदीमध्ये सुधारणा करण्यात आली असून (१) कर्मचारी निलंबित असल्यास (२) निलंबन कालावधी शिक्षा समजण्यात आल्यास (३) लाच लुचपत कारवाईबाबत न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्यास (४) आर्थिक फसवणूक अथवा आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी शिस्तभंग कारवाई सुरू असल्यास किंवा (५) फौजदारी कारवाईबाबत न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्यास अशा कालावधीमध्ये कर्मचाऱ्याचा उच्च वेतनश्रेणी देयतेचा दिनांक येत असल्यास त्यास सदरचा लाभ मंजूर करता येणार नाही. |
| ७ | **विभागीय परीक्षा पात्रता** | सा.आ.क्र. ७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ चे परिशिष्ट क मधील परिच्छेद क्र. १ अन्वये पदोन्नती करीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व अनुभव उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करतेवेळी देखील आवश्यक आहे. यास्तव ज्या पदावरील पदोन्नती करीता विभागीय परीक्षा आवश्यक आहे त्या पदाचा उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करतेवेळी देखील विभागीय परीक्षा आवश्यक आहे.<br><br>स.स्था.आ. क्र. ३० दि. २८.११.१९६० अन्वये विभागीय परीक्षेच्या अंतिम दिवसाच्या लगतनंतरचा दिनांक हा सदर अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक समजण्यात येईल. याबाबत निकाल जाहीर झाल्याचा दिनांक विचारात घेण्यात येणार नाही. इतर अटी व शर्तींच्या अधीन राहून विभागीय परीक्षेची अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक पदोन्नती / उच्च वेतनश्रेणी लाभ देयतेकरीता विचारात घेण्यात येईल.<br><br>प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८४ दि. २६.०३.२००३ अन्वये अभियंत्यांनी उच्च वेतनश्रेणी लाभ मिळण्याकरीता व्यावसायीक परीक्षा / सदर परीक्षेचे संबंधित पेपर उत्तिर्ण होणे आवश्यक आहे. उच्च वेतनश्रेणी लाभाच्या देय दिनांकानुसार |

| | | |
|---|---|---|
| | | प्रशासकीय परिपत्रक क्र. ६१८ दि. १७.०२.२०२१ विचारात घेण्यात येईल.<br><br>कर्मचा-याने त्याच्या संवर्गाशी संबंधित विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नसल्यास अशा कर्मचा-यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यानंतर त्यांना संबंधित विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येते. (प्रशासकीय परिपत्रक क्र. २६४ दि. १६.०२.१९९८ आणि प्रशासकीय परिपत्रक क्र. ३६० दि. २७.०४.२००१) |
| ८ | **जाती प्रमाणपत्र वैधता** | प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८३ दि. १९.०१.२०१२ अन्वये शासनाच्या धर्तीवर उच्च वेतनश्रेणी लाभाकरीता कर्मचा-याने पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे, यास्तव उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करतेवेळी जाती वैधता प्रमाणपत्र असणे ही बाब आवश्यक आहे. |
| ९ | **सेवाज्येष्ठता**. | सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ मधील परिच्छेद क्र.४ मधील तरतुदींनुसार विनंती बदलीवर रुजू झालेल्या कर्मचा-यास सेवाज्येष्ठता सोडावी लागली असल्यास (मंडलस्तरीय/विभागस्तरीय सेवा ज्येष्ठतेमधील कर्मचारी) अशा कर्मचा-यास त्याच्या लगतवरच्या ज्येष्ठ कर्मचा-यास उच्च वेतश्रेणीचा प्रथम लाभ मंजूर केल्यानंतरच उच्च वेतनश्रेणीचा प्रथम लाभ देय होतो.<br><br>सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ चे सुधारपत्र क्र. २६ दि. २०.०४.१९९८ नुसार विनंती बदलीवर रुजू झालेल्या कर्मचा-यास सेवाज्येष्ठता सोडावी लागली असल्यास (मंडलस्तरीय/विभागस्तरीय सेवा ज्येष्ठतेमधील कर्मचारी) अशा कर्मचा-याने प्रकरणपरत्वे नविन मंडल/ विभागामध्ये ९ वर्षे पूर्ण केल्याचा दिनांक अथवा त्याच्या लगतवरच्या ज्येष्ठ कर्मचा-यास उच्च वेतश्रेणीच्याव्दितीय लाभ देयतेचा दिनांक यापैकी जो अगोदर येईल त्या दिनांकापासून व्दितीय लाभ मंजूर करण्यात येईल. तथापि संबंधित कर्मचाऱ्यांने त्याच पदावर व्दितीय लाभाकरीता आवश्यक असणारा कमीतकमी कालावधी पूर्ण केला असणे आवश्यक आहे.<br><br>तथापि, प्रशासकीय परिपत्रक क्र. ३६५ दि. २५.१०.२०११ अन्वये उच्च वेतनश्रेणीच्या तृतीय लाभाबाबत उपरोक्त तरतुदी लागू नाहीत. |
| १० | **उच्चतम वेतनश्रेणी नंतरचे लाभ.** | प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४५ दि. २०.०२.२०१३ आणि ४५८ दि. १४.०५.२०१३ अन्वये अनुक्रमे मुख्य महाव्यवस्थापक व तत्सम यांच्या करीता उच्च वेतनश्रेणीच्या द्वितीय व तृतीय आणि कार्यकारी संचालक यांच्या करीता उच्च वेतनश्रेणीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय लाभाकरीता अतिरिक्त वेतनवाढ देण्याची तरतूद विहीत करण्यात आलेली आहे. |
| ११ | **देय तारखेस अस्तित्वात असणाऱ्या तरतुदी लागू असणे**. | सांघिक कार्यालयाचे पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.२८३/२१४१९दि. ०६.०९.२०१८ अन्वये कर्मचाऱ्यास उच्च वेतनश्रेणीचा लाभ ज्या तारखेस देय आहे त्या तारखेस अस्तित्वात असणाऱ्या तरतूदी विचारात घेउन उच्च वेतनश्रेणी लाभाची प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. |
| १२ | **शैक्षणिक अर्हता शिथिल न करणे.** | सुधारपत्र ४ दि. ०९.०१.१९८० आणि सुधारपत्र क्र. ५ दि. २२.०७.१९८० नुसार सक्षम निवड समिती शैक्षणिक अर्हता शिथील करू शकेल अशी तरतूद करण्यात आली होती. **सदर तरतूद सुधारपत्र क्र. २७ दि. २१.०५.१९९८ अन्वये रद्द करण्यात आलेली आहे.** |
| १३ | **पदोन्नती नाकारल्यास संबंधित पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ काढून घेण्याबाबत.** | सा.आ.क्र. ७४(क) दि. ३०.०४.१९७४ मधील परिच्छेद क्र. ७ नुसार, ज्या कर्मचाऱ्यास उच्च वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आलेला आहे अशा कर्मचाऱ्याने संबंधित पदावरील पदोन्नती नाकारल्यास, त्याला उच्च वेतनश्रेणी लाभ देण्यात आलेला नाही असे गृहीत धरून सदरचा लाभ मूळ दिनांकापासून काढून घेण्यात येईल. त्याप्रमाणे त्याची वेतननिश्चीत सुधारीत करण्यात येईल तथापि पदोन्नती आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणतीही वसुली करण्यात येणार नाही.<br><br>सुधारपत्र क्र. ३८ दि. २२.०३.२००५ अन्वये वेतनगट ४ मधील कर्मचाऱ्याने वयाची ५८ वर्षे पूर्ण केल्यानंतर त्यास वेतनगट ३ मधील पदावर पदोन्नत |

<table>
<tr><td></td><td></td><td>करण्यात आल्यानंतर त्यांने पदोन्नती नाकारल्यास सदर कर्मचाऱ्याचा संबंधित पदाचा उच्च वेतनश्रेणी लाभ काढून घेण्यात येणार नाही.</td></tr>
<tr><td>१४</td><td>असाधारण रजेमुळे उच्च वेतनश्रेणीचा लाभ पात्रता दिनांकामध्ये बदल होणार नाही.</td><td>विभागीय परिपत्रक क्र. ११३ दि. १७.०४.१९७५ मधील तरतुदींनुसार, सेवाविनियम क्र ४६ नुसार सक्षम अधिकारी यांनी मंजूर केलेली असाधारण रजा ही सेवाखंड समजण्यात येत नाही यास्तव अशा प्रकारच्या रजेमुळे कर्मचाऱ्याचा उच्च वेतनश्रेणी लाभाचा दिनांक पुढे ढकलण्यात येणार नाही.</td></tr>
<tr><td>१५</td><td>निलंबन कालावधी पात्र सेवाकालाधीमधून वजा करणे</td><td>विभागीय परिपत्रक क्र. २९६ दि. २५.०५.१९८३ नुसार उच्च वेतनश्रेणी लाभाकरीता एकूण सेवाकालावधीची गणना करीत असतांना निलंबन कालावधी त्यामधून वजा करून लाभ देण्याकरीता पात्र दिनांक सदर कालावधीसाठी पुढे ढकलण्यात येईल. तथापि, निलंबन कालावधी कर्तव्य कालावधी समजण्यात आल्यास मूळ देय दिनांकापासून लाभ मंजूर करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>१६</td><td>उच्च वेतनश्रेणी लाभ प्राप्त कर्मचाऱ्यास सेवाविनियम क्र. ३२ (ख) लागू करणे.</td><td>विभागीय परिपत्रक क्र. ३१० दि. २३.१२.१९८३ अन्वये कर्मचारी सेवाविनियमातील प्रचलित नियमांनुसार वेतन निश्चितीबाबतच्या सर्व तरतुदी उच्च वेतनश्रेणी लाभ प्राप्त कर्मचाऱ्यास लागू असतील. यास्तव सेवाविनियम क्र. २९ (क) तसेच ३२ (ख) मधील तरतुदी लागू असतील.</td></tr>
<tr><td>१७</td><td>पदोन्नती नाकारलेल्या प्रकरणांबाबत.</td><td>विभागीय परिपत्रक क्र. ३१९ दि. १९.०४.१९८४ नुसार, ज्या कर्मचाऱ्याने पदोन्नती नाकारली आहे अशा कर्मचाऱ्याचा पदोन्नती नाकारण्यापूर्वीचा सेवाकालावधी उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करतेवेळी ग्राहय धरण्यात येणार नाही. प्रकरणपरत्वे पदोन्नती नाकारल्यानंतर ६ अथवा ९ वर्षांचा कालावधी उच्च वेतनश्रेणीचा प्रथम अथवा व्दितीय लाभ मंजूर करतेवेळी ग्राहय धरण्यात येईल.</td></tr>
<tr><td>१८</td><td>मानीव तारखेपासून उच्च वेतनश्रेणी लाभाकरीता सेवा ग्राहय धरणे.</td><td>ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती / नियुक्तीची मानीव तारीख मंजूर करण्यात आलेली आहे, अशा कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करतेवेळी प्रशासकीय परिपत्रक क्र १३३ दि. ०२.११.१९९२ नुसार मानीव तारखेपासून प्रकरणपरत्वे ६ / ९ / २८ वर्षांचा सेवाकालावधी गणना करण्यात यावा.</td></tr>
<tr><td>१९</td><td>निम्नस्तर लिपिक यांना शैक्षणिक अर्हतेबाबत सवलत देण्याबाबत.</td><td>प्रशासकीय परिपत्रक क्र. १३८ दि. २६.०८.१९९३ नुसार दि. २३.०७.१९९० पूर्वी सेवेत रूजू झालेल्या निम्नस्तर लिपिक यांना उच्चस्तर लिपिक या पदोन्नतीकरीता / उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करण्याकरीता १२ वी उत्तिर्ण असण्याची अटीपासून सवलत देण्यात आलेली आहे.</td></tr>
<tr><td>२०</td><td>नक्षलग्रस्त / अदिवासी भागामध्ये कार्यरत तथा एकस्तर पदोन्नती लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांनाउच्च वेतनश्रेणी लाभ देयतेबाबत.</td><td>आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून वेतनगट १ ते ४ मधील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यास त्या क्षेत्रात असेपर्यंतच्या काळात त्याने धारण केलेल्या मूळ पदाच्या नजिकच्या / पदोन्नतीची वेतनश्रेणी व त्या अनुषंगाने वेतन निश्चीतीचा लाभ देण्यात यावा. ज्या कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा [सा.आ. ७४ (क)/ सा.आ. १११(क)] लाभ दिलेला आहे. त्यांना आणखी वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय नसेल ही एकस्तर पदोन्नतीची योजना दि. ०१.०७.२००२ पासून अंमलात येईल आणि ती संबंधीत कर्मचारी आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असे पर्यंतच अनुज्ञेय राहील. त्या क्षेत्रातून कर्मचारी बिगर आदिवासी क्षेत्रात परत आल्यावर तो त्याच्या मूळच्या संवर्गाच्या वेतनश्रेणीत पूर्वीच्या वेतनाच्या अनुषंगाने वेतन घेईल.</td></tr>
<tr><td>२१</td><td>कारागीर -अ यांना उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करण्याबाबतच्या तरतुदी.</td><td>मराविविकंम, कर्मचारी सेवाज्येष्ठता विनियमातील वितरण संवर्ग ३ (Distribution Cadre III) मधील सुव्यवस्था शाखा (विद्युत/चाचणी) [Maintenance Wing (Electrical/ Testing)] अंतर्गत कार्यरत असणारे कारागीर -अ (Artisan -A) हे खालीलप्रमाणे उच्च वेतनश्रेणीचे लाभ मिळण्यास पात्र असतील.
<table>
<tr><th>प्रथम लाभाचे पद</th><th>व्दितीय लाभाचे पद</th><th>तृतीय लाभाचे पद</th></tr>
<tr><td>मुख्य कार्यदेशक</td><td>उपकार्यकारी अभियंता</td><td>अतिरिक्त कार्यकारी अभियंता</td></tr>
</table>
तथापि, मराविविकंम, कर्मचारी सेवाज्येष्ठता विनियमातील वितरण संवर्ग ४/ स्थापत्य २ (Distribution Cadre III/ Civil II) मध्ये कार्यरत असणारे कारागीर -</td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>अ (कार्यशाळा/ सांधाता /कातारी/ जोडारी/ केबल योजी/ दुय्यम अवेक्षक श्रेणी-१/ मिटर निरीक्षक श्रेणी-१/ मिटर चाचणीकार श्रेणी-१ आणि वितरण संवर्ग ३ मध्ये समावेश नसलेले कारागीर-अ) हे खालीलप्रमाणे उच्च वेतनश्रेणीचे लाभ मिळण्यास पात्र असतील.
<table>
<tr><td>प्रथम लाभाचे पद</td><td>व्दितीय लाभाचे पद</td><td>तृतीय लाभाचे पद</td></tr>
<tr><td>दुय्यम अभियंता</td><td>सहाय्यक अभियंता</td><td>उपकार्यकारी अभियंता</td></tr>
</table>
वरील तरतुदींबाबत सा.आ. क्र.७४(क) दि.३०.०४.१९७४ चे सुधारपत्र क्र. ११ दि. १४.१०.१९८६, सुधारपत्र क्र.१९ दि.१७.०३.१९९३ आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.४४० दि.१८.१०.२००४ तसेच सांघिक कार्यालयाचे पत्र क्र. मासं/रवका/ न.क्र.२८३/१५५६९ दि.०४.०६.२०१२ विचारात घेण्यात यावे.</td>
</tr>
<tr>
<td>२२</td>
<td>तृतीय लाभाच्या तरतुदी.</td>
<td>प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० अन्वये दि.०१.०४.२००८ रोजी अथवा तदनंतर सेवेची एकूण २८ पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ मंजूर करण्यात येईल.<br><br>प्रथम व द्वितीय लाभ मंजूर झाले असतील तरच कर्मचारी तृतीय लाभास पात्र होतील.<br><br>तृतीय लाभ देयतेच्या दिनांकापूर्वीच्या तीन वर्षांमध्ये कर्मचाऱ्यांने पदोन्नती अथवा उच्च वेतनश्रेणीचा लाभ घेतलेला नसावा.<br><br>पदोन्नती नाकारल्याने ज्या कर्मचाऱ्याचा प्रथम व व्दितीय लाभ काढून घेण्यात आलेला आहे अशा कर्मचाऱ्यास तृतीय लाभ देण्यात येणार नाही.<br><br>प्रशासकीय परिपत्रक क्र. ३४२ दि. ०७.०६.२०११ नुसार ज्या कर्मचाऱ्याने दि. ०१.०४.२००८ पूर्वी सेवेची २८ वर्षे पूर्ण केली आहेत आणि तो ०१.०४.२००८ रोजी कंपनीच्या सेवेत कार्यरत आहे असा कर्मचारी दि. ०१.०४.२००८ रोजी अथवा पात्रतेचा दिनांक यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकास तो तृतीय लाभास पात्र असेल.<br><br>ज्या कर्मचाऱ्याने तृतीय लाभाच्या देय दिनांकापूर्वीच्या तीन वर्षांमध्ये पदोन्नती / उच्च वेतनश्रेणीचा व्दितीय लाभ घेतला आहे असा कर्मचारी पदोन्नती / व्दितीय लाभाच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी पूर्ण केल्यानंतर तो तृतीय लाभास पात्र असेल.<br><br>ज्या कर्मचाऱ्याने सेवेची २८ वर्षे पूर्ण केल्यानंतर पदोन्नती / उच्च वेतनश्रेणीचा व्दितीय लाभ घेतला आहे असा कर्मचारी पदोन्नती / व्दितीय लाभाच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी पूर्ण केल्यानंतर तो तृतीय लाभास पात्र असेल.<br><br>एखादा कर्मचारी २८ वर्षांची सेवा पूर्ण करतेवेळी त्याने तत्पूर्वी घेतलेल्या व्दितीय लाभापेक्षा वरीष्ठ पदावर कार्यरत असेल अशा प्रकरणी त्यास वरीष्ठ पदाच्या पुढील वेतनश्रेणी तृतीय लाभ म्हणून मंजूर करण्यात येईल.<br><br>२८ वर्षापूर्वीच्या तीन वर्षांमध्ये कर्मचाऱ्याची सरळसेवा भरतीव्दारे / अंतर्गत अधिसूचनेव्दारे नियुक्ती झाली असल्यास तो सदर पदावर रूजू झाल्याच्या दिनांकापासून त्यांने तीन वर्षांचा कालावधी पूर्ण केल्यानंतर तृतीय लाभास पात्र असेल.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| २३ | **नाकारलेल्या उच्च वेतनश्रेणी लाभाची पुन:श्च देयता.** | प्रशासकीय परिपत्रक क्र. ४०६ दि. २१.०४.२०१२ नुसार एखाद्या कर्मचाऱ्याने उच्च वेतनश्रेणीचा प्रथम / व्दितीय / तृतीय लाभ नाकारल्यानंतर सदर लाभ मिळण्यासाठी पुन:श्च विनंती केल्यास, उच्च वेतनश्रेणी लाभ नाकारल्याच्या दिनांकापासून दोन वर्षानंतरचा दिनांक अथवा त्याने नव्याने केलेल्या विनंती अर्जाचा दिनांक यापैकी जो नंतरचा दिनांक असेल त्या दिनांकास सदर कर्मचारी उच्च वेतनश्रेणीचा लाभ पुन:श्च मिळण्यास पात्र असेल. |
| २४ | **धारणाधिकार रजा (Lien Leave) आणि उच्च वेतनश्रेणी लाभ** | मराविविकंम, कर्मचारी सेवाविनियम -२००५ चे सुधारपत्र क्र.४५ दि. ०१.११.२०१९ नुसार धारणाधिकार रजा कालावधीमध्ये संबंधित कर्मचारी उच्च वेतनश्रेणी लाभ मिळण्यास पात्र असणार नाही. धारणाधिकार रजा उपभोगून कर्मचारी सेवेत पुन:श्च रूजू झाल्यानंतर धारणाधिकार रजेचा कालावधी वगळून सदर कर्मचारी ज्या दिनांकास ६ / ९ / २८ वर्षांचा कालावधी पूर्ण करीत असेल त्या दिनांकास तो उच्च वेतनश्रेणी लाभ मिळण्यास पात्र असेल. |
| २५ | **अध्ययन रजा (Study Leave) आणि उच्च वेतनश्रेणी लाभ** | मराविविकंम, कर्मचारी सेवाविनियम -२००५ चे सुधारपत्र क्र.४६ दि.१९.११.२०१९ नुसार अध्ययन रजा कालावधीमध्ये कर्मचाऱ्यास उच्च वेतनश्रेणी लाभ देय असणार नाही. तथापि, कर्मचारी अध्ययन रजेवरून पुन:श्च सेवेत रूजू झाल्यानंतर त्याच्या मूळ देय दिनांकापासून तो उच्च वेतनश्रेणीचा लाभ मिळण्यास पात्र असेल. |
| २६ | **मालमत्ता विवरणपत्र सादर करणे आवश्यक.** | प्रशासकीय परिपत्रक क्र.५१० दि.१६.०६.२०१५ अन्वये पदोन्नतीकरीता मालमत्ता विवरणपत्र सादर करणे आवश्यक असल्याने उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूरीकरीता देखील ते सादर केले असणे आवश्यक आहे. |
| २७ | **कर्मचाऱ्याचे सध्याचे कार्यक्षेत्र विचारात घेउन लाभ मंजूर करणे.** | मासंवि/रवका/न.क्र.२८३/०२१८८ दि.२१.०१.२०२५ अन्वये उच्च वेतनश्रेणी लाभ देय असलेला कर्मचारी सध्या ज्या सक्षम अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात कार्यरत आहे त्या कार्यालयामार्फत संबंधित कर्मचाऱ्याच्या लाभाचा देय दिनांक विचारात न घेता सदर लाभ प्रकरणी निर्णय घेण्यात येईल. |
| २८ | **SAP प्रणालीव्दारे उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करणे.** | प्रशासकीय परिपत्रक क्र.६८४ दि.०६.११.२०२४ अन्वये उच्चवेतनश्रेणीचे लाभ SAP प्रणालीद्वारे मंजूर करण्याकरिता चार स्तर तयार करण्यात आले असून विविध वेतनगटामधील कर्मचाऱ्यांचे उच्चवेतनश्रेणीचे लाभ मंजूर करण्याकरिता वेतनगटानुसार त्या-त्या स्तराकरिता (एल - १ ते एल - ४) अधिकारी विहित करण्यात आलेले आहेत. |
| २९ | **उच्च वेतन श्रेणीचा तृतीय लाभ देयतेबाबतच्या मार्गदर्शक सूचना.** | वेतनत्रुटी निवारण समितीने (Anomaly Committee) केलेल्या शिफारसीनुसार प्रशासकीय परिपत्रक क्र.६८५ दि.२४.१२.२०२४ अन्वये पुढील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.<br>"उच्च वेतनश्रेणीचा तिसरा लाभ मंजूर करताना जर एखाद्या कर्मचाऱ्याची मागील तीन वर्षात पदोन्नती झाली असेल तथापि त्याच्या वेतनश्रेणीमध्ये बदल झाला नसेल (व्दितीय लाभाच्या पदावर झालेल्या पदोन्नतीमुळे) अशा प्रकरणी मागील तीन वर्षामध्ये मिळालेल्या पदोन्नतीमुळे तृतीय लाभाच्या दिनांकामध्ये बदल केला जाणार नाही. इतर प्रकरणांमध्ये प्रशासकीय परिपत्रक क्र.३४२ दि.०७.०६.२०११ मधील मूळची तरतूद लागू राहील." |
| ३० | **नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना देय असलेल्या एकस्तर पदोन्नती तसेच उच्च वेतनश्रेणीच्या लाभाबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना.** | प्रशासकीय परिपत्रक क्र.६९८ दि.१४.१०.२०२५ अन्वये कंपनीअंतर्गत एकस्तर पदोन्नतीचा लाभ व कंपनीने विहित केलेल्या कालमर्यादेनुसार मंजूर करण्यात येणारा उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.<br>त्यानुसार आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यास एकस्तर पदोन्नती व उच्च वेतन श्रेणी लाभ या दोन्ही योजना लागू आहेत. मात्र बिगर आदिवासी व बिगर नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यास केवळ उच्च वेतन श्रेणी लाभ योजना लागू आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | उपरोक्त दोन्ही योजनेचे प्रयोजन तसेच कार्यक्षेत्र जरी भिन्न असले तरी दोन्ही योजनेंतर्गत मिळणारा आर्थिक लाभ हा समान आहे. यास्तव एकाच वेळी दुहेरी लाभ देणे अभिप्रेत नाही, म्हणजेच एका योजनेंतर्गत लाभ मिळाल्यानंतर दुसऱ्या योजनेंतर्गत वेगळयाने लाभ देणे अभिप्रेत नाही. |

# **टिप -** उपरोक्त मुद्दे हे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या विनियमांचे / स्पष्टीकरणात्मक मार्गदर्शनांचे फक्त एकत्रिकरण असून उच्च वेतन श्रेणीचे लाभ मंजूर करण्याकरिता संबंधीत कालावधीसाठी लागू असलेल्या तरतूदींचे अवलोकन करण्यात यावे.

******